पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव-३३
गक्षेका/४/कावि /४१/२०१८
दिनांक : ३/०५/२०१८

प्रति,
मा. ---- ---------------- -
सदस्य/ सदस्या, गप्रभागसमिती
पिंपरीचिंचवडमहानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा **सोमवार दि. ७/५/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची मासिकसभा सोमवार **दिनांक ७/५/२०१८ रोजी सकाळी ११.००**वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील “ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह ” येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेसआपणउपस्थितरहावेहीविनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
गप्रभागसमिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक २**

**दिनांक: ७/५/२०१८** वेळ: **सकाळी ११.०० वाजता**

---

पिंपरीचिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार **दिनांक ७/५/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता** ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

१) दि. ५/३/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. ९ ) कायम करणे.
२) दि.२६/४/२०१८ रोजीचे विशेष सभेचा सभावृत्तांत ( नामनिर्देशित स्वीकृत सदस्य निवड) कायम करणे
३) दि.२७/४/२०१८ रोजीचे विशेष सभेचा सभावृत्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र.१) कायम करणे.

विषय क्रमांक – १)मा.उषा वाघेरे यांनी दिनांक ३/०२/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार पिंपरी वाघेरे येथील जलतरण तलावास " श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – २) कार्यकारी अभियंता स्थापत्य यांचे जा.क्र.गक्षेका/स्था/कावि/३७१/२०१८ दि.२८/३/२०१८ चे पत्रान्वये श्री.ऍड सुभाष सावन माछरे यांची सदस्य दूरसंचार सल्लागार समिती भारत सरकार म्हणुन पुणे जिल्हयासाठी निवड झाली असुन त्यांचे नावाचे एकुण दोन नामफलक लावणेबाबत संदर्भिय पत्रान्वये मागणी केली आहे. तरी सदरचा नामफलक लावणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – ३) मा.संदिप बाळकृष्ण् वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे प्रभाग क्र.२१ मधील जिजामाता हॉस्पिटल जवळ उभारण्यात आलेल्या कमानीस "शिवस्फुर्ती स्मारक" पिंपरी वाघेरे गाव कडे असे नामकरण करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – ४) मा.संदिप बाळकृष्ण् वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्रमांक २१ मधील पिंपरी वाघेरे गावातील नव्याने विकसित होणा-या १८ मीटर डी पी रस्त्यामध्ये लक्ष्मी रेसिडन्सी जवळील चौकामध्ये धर्मवीर संभाजी महाराज स्मृती शिल्प उभारण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – ५) मा.संदिप बाळकृष्ण् वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्रमांक २१ मधील पिंपरी वाघेरे गावाला कुस्ती खेळाने नावलौकिक मिळवुन दिलेला आहे. राज्यपातळीवर खेळणारे मल्ल या गावामध्ये घडलेले आहेत. येणा-या नवीन तरुण पिढीला प्रोत्साहन मिळणेसाठी पवनेश्वर चौक, कापसे आळी येथे कुस्ती शिल्प उभारण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – ६) मा.संदिप बाळकृष्ण् वाघेरे यांचे दिनांक ०२/०४/२०१८ चे पत्रानुसार (प्रभाग क्र.२१)पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे मिलिंदनगर येथे पुनर्वसन प्रकल्प उभारण्यात आला होता. सदर प्रकल्पाच्या जवळ सुभेदार रामजी आंबेडकर नगर, मिलिंदनगर पुनर्वसन प्रकल्प या नावे कमान उभारण्यात यावी. तसेच सदर प्रकल्पाच्या बाजूच्या नाल्यावर स्लॅब टाकण्यात आलेला आहे, त्याठिकाणी हॉकर्स झोन विकसीत करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – ७) कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.गक्षेका/स्था/कावि/४५०/२०१८ दि.२८/४/२०१८ चे पत्रानुसार श्री.संभाजी बाळासाहेब बारणे यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदी व श्रीम.मनिषा संभाजी बारणे यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदी नुकतीच निवड झाली असलेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे. तरी त्यांचे नावाचे एकत्रित एकुण चार नामफलक लावणेबाबत मागणी केली आहे. तरी सदरचा नामफलक लावणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – ८) मा.निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील मिलिंदनगर पुर्नवसन प्रकल्प याला **“सुभेदार रामजी आंबेडकर वसाहत”** हे नाव कमान टाकुन नाम दर्शविण्यात यावे असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे तरी सदर विषयास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – ९) मा.निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्रानुसार जिजामाता चौकात तीन ठिकाणी रस्ते फुटतात, याठिकाणी वाहनांची ये जा जास्त प्रमाणात होत असल्याकारणाने या ठिकाणी कसल्याही प्रकारचा धोका होऊ नये, तसेच जय हिंद हायस्कुल मधील येणा-या जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे या ठिकाणी ग्रेडसेपरेटर टाकण्याची गरज आहे. तरी सदर ठरावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक – १०) मा.निकिता अर्जुन कदम यांचे दिनांक २/५/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील पिंपरी गावातील पवनेश्वर चौक येथे नाव देणेत यावे अशी मागणी येथील नागरिक करत आहे. त्यांच्या मागणीनुसार "**पैलवान भाऊसाहेब महादेव कापसे**" असे नाव देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्रशासनअधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
गप्रभागसमिती

पिंपरीचिंचवडमहानगरपालिका
गक्षेत्रीयकार्यालय, थेरगाव-३३
गक्षेका /४/कावि/४१/२०१८
दिनांक : ३/०५/२०१८